(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**नागपूर खंडपीठ, नागपूर**

**रिट याचिका क्रमांक ५५३६/ २०२४**

१. आर्यन नरेश शेंडे,

वय : २० वर्षे, व्यवसाय : शिक्षण ,

पत्ता : ५६१ - आनंद नगर,

राणी दुर्गावती नगर, नागपूर, महाराष्ट्र. ..... याचिकाकर्ता

विरुद्ध

१. महाराष्ट्र राज्य,

प्रधान सचिव यांच्या मार्फत,

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

२. आयुक्त,

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा सेल,

महाराष्ट्र राज्य,

आठवा मजला, न्यू एक्सेलिसियर बिल्डिंग,

ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.

३. कर्मवीर दादासाहेब कन्नमवार (के.डी.के.)

इंजिनिअरिंग कॉलेज,

नागपूर,

प्राचार्य व प्रवेश कक्ष यांच्या मार्फत ,

ग्रेट नाग रोड, नंदनवन ,

नागपूर - ४४०००९. ....... उत्तरवादी

कु. आयुषी मिश्रा, याचिकाकर्त्या तर्फे वकील .

श्री. सुशील घोडेस्वार, उत्तरवादी क्र.१ तर्फे सहाय्यक सरकारी वकील.

श्री.निखिल गायकवाड, उत्तरवादी क्रमांक २ तर्फे वकील.

श्री. कौस्तुभ पाटील, उत्तरवादी क्र.३ तर्फे वकील.

न्यायमंच : न्या. भारती डांगरे आणि न्या. अभय मंत्री.

दिनांक : ३ ऑक्टोबर २०२४

<u>न्यायनिर्णय ( न्यायमूर्ती भारती डांगरे द्वारे) :</u>

१. न्यादेश. न्यादेशावर त्वरित उत्तर देण्यात येत आहे. उत्तरवादींतर्फे संबंधित वकीलांनी सुनावणीची नोटीस मिळाली हे घोषित केले. अखेर पक्षकारांच्या विद्वान वकिलांच्या संमतीने अंतिम सुनावणी झाली.

२. याचिकाकर्ता हा, जातीचा दाखला सादर न केल्याच्या क्षुल्लक कारणास्तव आणि याचिकाकर्त्याने खरे कारण दाखवूनही उत्तरवादी क्रमांक ३, कर्मवीर दादासाहेब कन्नमवार (के.डी.के.) अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर मध्ये याचिकाकर्त्याला जागा नाकारणे या उत्तरवादी क्रमांक २ व ३ च्या तथाकथित मनमानी कारवाईमुळे व्यथित झालेमुळे, पुढील दिलास्यांसाठी या न्यायालयात धाव घेतली आहे :

"ए. की, परमादेशाच्या स्वरूपात योग्य रिट, आदेश किंवा निर्देश देऊन, उत्तरवादी क्रमांक ३ यांना उत्तरवादी क्रमांक २ ने घातलेल्या अटींचे पालन करण्याचे निर्देश देणे आणि त्यानुसार याचिकाकर्त्याच्या प्रवेश कायम करणे तसेच मूळ जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ देणे.

बी. तसेच कॅप राऊंड १ च्या प्रवेश प्रक्रिया लागू करणे आणि त्याचे प्रचालन याला स्थगिती द्यावी, कारण उत्तरवादी क्रमांक ३ हे कॅप राऊंड १ चा कोटा पूर्ण करण्यासाठी इतर उमेदवारांना सहजच प्रवेश देवू शकतात आणि याचिकाकर्ते क्रमांक १ ला त्याची जागा गमवावी लागू शकते आणि त्याच्या कारकीर्दीचे पूर्ण वर्षाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. ”

महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ च्या प्रवेशासाठी माहिती पत्रकासह पूर्णवेळ व्यावसायिक स्नातक पूर्व (अंडर ग्रॅज्युएट) अभ्यासक्रमाच्या जागा भरण्यासाठी सुरू केलेल्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या आर्यन नरेश शेंडे यांनी ही याचिका दाखल केली आहे.

याचिकाकर्त्याने महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमात प्रवेश मिळविण्यासाठी एमएचटी-सीईटी २०२४ साठी अर्ज केला आणि केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेत (कॅप) भाग घेतला आणि त्याला त्याचे प्रथम पसंती दिलेले कॉलेज म्हणजेच कर्मवीर दादासाहेब कन्नमवार (के.डी.के.) इंजिनिअरिंग कॉलेज, नागपूर हे देण्यात आले होते कारण

सीईटीमध्ये मिळालेल्या गुणांमुळे तो त्याच्या गुणवत्तेच्या आधारावर या कॉलेजमधील जागेसाठी पात्र ठरत होता.

याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, कॅपच्या नियमांनुसार त्याने 'ऑटो फ्रीज' हा पर्याय निवडला आणि त्यानंतरच्या कॅप राऊंडमध्ये सहभागी होण्याची शक्यता प्रभावीपणे बंद केली, कारण कॉलेज आणि शाखे ने जे वाटप केले होते त्यावर तो समाधानी होता, जो तो करू इच्छित होता आणि म्हणूनच त्याने ऑनलाइन प्रवेश कायम केला आणि वेब पोर्टलवर आवश्यक कागदपत्रे अपलोड करून आवश्यक प्रक्रिया देखील पूर्ण केली. मात्र, याचिकाकर्त्याकडे जात वैधता प्रमाणपत्र असूनही आणि कॅप राऊंड - ३ द्वारे जात प्रमाणपात्राची मूळ प्रत देण्याचे स्वयंघोषित शपथपत्र सादर करूनही, जात प्रमाणपात्राची मूळ प्रत सादर केली नाही हे कारण देत कॉलेजने प्रवेश नाकारला .

याचिकाकर्त्याची तक्रार अशी आहे की, कॅप राऊंड - १ मध्ये त्याला देण्यात आलेल्या जागेवर त्याला प्रवेश नाकारण्यात आला होता आणि त्याच्या योग्यतेकडे आणि पात्रतेकडे दुर्लक्ष करून नंतरच्या

फेऱ्यांमध्ये भाग घेण्यापासूनही त्याला रोखण्यात आले ज्यामुळे त्याचे करिअर धोक्यात आले.

३. आम्ही याचिकाकर्त्यासाठी विद्वान वकील कु. आयुषी मिश्रा यांचे म्हणणे ऐकले आहे, ज्यांना आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांचे प्रतिनिधीत्व करणारे विद्वान वकील श्री निखिल गायकवाड आणि के. डी. के. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर यांचे प्रतिनिधित्व करणारे विद्वान वकील श्री. कौस्तुभ पाटील यांच्या विरोधाला सामोरे जावे लागले.

महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण यांचे प्रतिनिधित्व हे विद्वान सहाय्यक सरकारी वकील श्री. सुशील घोडेस्वार करत आहेत.

आम्ही याचिकेतील तथ्ये एकत्रित केली आहेत ज्यात त्यामध्ये मागितलेल्या दिलास्याच्या संदर्भात आवश्यक वादकथन हे त्याच्या समर्थनार्थ आवश्यक असलेल्या परिशिष्ठांसह समाविष्ट आहे.

के.डी.के. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर, म्हणजेच उत्तरवादी क्रमांक ३ ने देखील आपले उत्तराचे शपथपत्र दाखल केले आहे, ज्यात उत्तरवादी क्रमांक २ ने प्रकाशित केलेल्या माहितीपत्रकाची

प्रत आणि उत्तरवादी क्रमांक ३ तसेच उत्तरवादी क्रमांक २ यांच्यात झालेला पत्रव्यवहार देखील आहे.

उत्तरवादी क्रमांक २, राज्य प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त यांनी देखील २४ सप्टेंबर २०२४ रोजी एक शपथपत्र दाखल केले आहे, ज्यामध्ये असे सुचविण्याचा प्रयत्न केला जातो की, याचिकाकर्त्याने सदर कॅप राउंड - ३ च्या निष्कर्षावरच या न्यायालयात धाव घेतली आहे, जेव्हा संस्थात्मक स्तर फेरी सुरू झाली आहे आणि याचिकाकर्त्याने संस्थात्मक स्तर फेरीत भाग न घेण्याचा निर्णय घेतला आहे.

याचिकाकर्त्या तर्फे विद्वान वकील कु. आयुषी मिश्रा यांनीही ३० सप्टेंबर २०२४ रोजी आपले लेखी म्हणणे सादर केले आहे, ज्यात याचिकाकर्त्याने रिट याचिकेत मागितलेल्या दिलास्यांचा पुनरुच्चार केला आहे आणि उत्तरवादी क्रमांक २ आणि ३ ने स्वीकारलेल्या भूमिकेला विरोध करून, याचिकाकर्त्याला त्याच्या गुणवत्तेच्या आधारावर त्याच्या पसंतीच्या संस्थेत प्रवेश घेण्याचा कायदेशीर अधिकार नाकारण्याचा प्रयत्न केला गेला.

४. आपल्यासमोर ठेवलेल्या तारखा आणि घटनांच्या अनुक्रमातून आपण काही निर्विवाद तथ्यांची नोंद घेतली आहे -

(ए) याचिकाकर्ता हा एमएचटी - सीईटीला बसला होता आणि जेव्हा १६ जून २०२४ रोजी निकाल जाहीर झाला तेव्हा त्याने ७६.०३३७७७३ टक्के गुण मिळवले होते, जे दर्शविते की प्राप्त केलेली जागा शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी वैध आहे.

(बी) अभियांत्रिकी/तंत्रज्ञान प्रवेश २०२४ मधील प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाल्यानंतर याचिकाकर्त्याला त्याच्या गुणवत्तेच्या टक्केवारीनुसार संगणक विज्ञान व अभियांत्रिकीमध्ये नागपूरच्या के. डी. के. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये तात्पुरती जागा देण्यात आली होती.

(सी) त्यांच्या उमेदवारीचा प्रकार हा महाराष्ट्र-अ म्हणून आणि प्रवेशासाठीचा प्रवर्ग हा 'एससी' म्हणून दाखवण्यात आला होता. त्यांना देण्यात आलेल्या जागेचे स्वरूप हे जीएससीएच (होम युनिव्हर्सिटी जनरल एससी) होता.

(डी) १६ ऑगस्ट २०२४ रोजी याचिकाकर्त्याने निश्चित केलेली जागा स्वीकारल्यानंतर कॅप राऊंड-१ मध्ये त्याच्या नावे तात्पुरते वाटप केल्याने 'ऑटो फ्रीजिंग' झाले.

५. या टप्प्यावर, आम्ही माहिती पुस्तिकेतील तरतुदीची देखील नोंद घेतली पाहिजे, जी २०२४-२०२५ साठी अंडर ग्रॅज्युएट आणि पोस्ट ग्रॅज्युएट टेक्निकल कोर्सेसच्या प्रवेशांना नियंत्रित करते, ज्यात स्पष्टपणे नमूद केले आहे की गृह विद्यापीठाच्या जागा आणि राज्यस्तरीय जागा वगळता गृह विद्यापीठाच्या जागांच्या कॅप राउंड - १, २ आणि ३ चे वाटप महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारांची 'परस्पर गुणवत्ता' म्हणून केले जाईल आणि कॅप राऊंड-१, २ आणि ३ च्या टप्प्यात परस्पर गुणवत्ता, भरलेले पर्याय आणि त्यावेळी उपलब्ध जागांनुसार उमेदवारांना जागा वाटप करायच्या आहेत.

अंडर ग्रॅज्युएट आणि पोस्ट ग्रॅज्युएट टेक्निकल कोर्सेसच्या प्रवेशासाठी (२०२४-२५) माहिती पुस्तिकेच्या खंड १२ मध्ये खालीलप्रमाणे विचार केला आहे :

“ १२. सामान्य तरतुदी

(ए) गृह विद्यापीठाच्या जागा आणि राज्यस्तरीय जागा वगळता गृह विद्यापीठाच्या जागांच्या कॅप राउंड - १, २ आणि ३ चे वाटप महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारांची 'आंतर-से गुणवत्ता' म्हणून केले जाईल. कॅप राऊंड-१, २ आणि ३ च्या टप्प्यात परस्पर गुणवत्ता, भरलेले पर्याय आणि त्यावेळी उपलब्ध जागांनुसार उमेदवारांना जागा वाटप केले जाईल ;

(जी) भरलेल्या पसंतीच्या क्रमाने पहिल्या उपलब्ध पर्यायासमोरील वाटप हे अंतिम वाटप म्हणून राखले जाईल;

(एच) वेबसाइटवर प्रदर्शित केलेल्या वाटप यादीमध्ये उमेदवारांना देण्यात आलेले तात्पुरते वाटप दर्शविले जाईल. या संदर्भात उमेदवारांना कोणतेही वैयक्तिक पत्र किंवा वाटप पत्र दिले जाणार नाही ;

(आय) ज्या उमेदवाराला जागा देण्यात आली आहे त्याने "प्रोव्हिजनल सीट अलॉटमेंट लेटर" डाऊनलोड करावे. जागा स्वीकारताना उमेदवाराला ऑनलाइन पद्धतीने जागा

स्वीकृती शुल्क भरावे लागते किंवा ऑनलाइन अर्ज प्रणालीत अपलोड केलेल्या कागदपत्रांची स्वयंछाननी करताना भरता येऊ शकते किंवा ॲडमिशन रिपोर्टींग सेंटर वर सक्षम प्राधिकरणाच्या बाजूने डिमांड ड्राफ्टद्वारे भरता येते. मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर आणि उमेदवाराने पात्रतेच्या सर्व निकषांची पूर्तता केली आहे किंवा ऑनलाइन अर्ज प्रणालीमध्ये अपलोड केलेल्या दस्तऐवजाची स्वयंतपासणी केली गेली आहे याची खात्री केल्यानंतर, स्वीकृतीची ऑनलाइन पावती ही केंद्र प्रभारी द्वारे किंवा ऑनलाइन पद्धतीने दिली जाईल ;

(के) उमेदवाराने जागा स्वीकारली आहे असे कळवले नाही तर त्याने प्रस्ताव नाकारला आहे असे समजले जाईल;

(जे ) जर कोणतेही कागदपत्र किंवा प्रमाणपत्र अवैध किंवा फसवे आढळल्यास आणि / किंवा उमेदवार पात्रतेच्या

निकषांची पूर्तता करत नसल्यास वाटप केलेली जागा हि कोणत्याही वेळी, रद्द केली जाईल.

६. याचिकाकर्त्याचे हे एक विशेष प्रकरण आहे की, त्याने १६ ऑगस्ट २०२४ रोजी उत्तरवादी क्रमांक ३ - महाविद्यालयातील त्याची जागा ' ऑटो फ्रीज ' केल्यामुळे आणि समुपदेशनाची दुसरी फेरी १९ ऑगस्ट २०२४ पासून सुरू होणार असल्याने त्याने १६ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२४ दरम्यान उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजला अहवाल द्यायचा होता.

कॅप प्रक्रियेनुसार कागदपत्रांच्या प्रत्यक्ष पडताळणीसाठी याचिकाकर्ते १७ ऑगस्ट २०२४ रोजी उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजसमोर हजर झाले.

उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजने याचिकाकर्त्याला प्रवेश नाकारला, कारण तो जात दाखल्याची मूळ प्रत सादर करू शकला नाही आणि महाविद्यालयाने अवलंबलेली ही एक विशिष्ट भूमिका आहे की संस्थात्मक स्तरावर मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्याची अट शिथिल करण्यासाठीचा अधिकार त्याला नव्हता / त्याला अधिकृत

करण्यात आले नव्हते किंवा मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी वेळ वाढविण्याचा अधिकारही देण्यात आलेला नाही.

७. आमच्यासमोर केलेल्या युक्तिवादानुसार, याचिकाकर्त्याचे विशिष्ट प्रकरण आहे की, याचिकाकर्ते सर्व आवश्यक कागदपत्रांसह उत्तरवादी क्रमांक ३ - महाविद्यालयासमोर हजर झाले, ज्यात जिल्हा जात प्रमाणपत्र छाननी समितीने ७ सप्टेंबर २०२२ रोजी त्याच्या नावे एकमताने दिलेले वैधतेचे प्रमाणपत्र समाविष्ट होते, ज्यात तो 'चांभार' (अनुसूचित जाती) या जातीचा असल्याचे प्रमाणित केले होते पण जातीचा दाखला नसल्याने त्याने जेव्हा त्याची शैक्षणिक कागदपत्रे, म्हणजे दहावी व बारावीच्या गुणपत्रिका, अधिवास, जातीचा दाखला, जात वैधता, आधार, इयत्ता बारावीचे टी.सी. आणि पदवीचे शैक्षणिक निकाल असलेली फाईल दिनांक २५ जून २०२४ रोजी बोरिवली मार्केट रोड, मुंबई येथून हरवली होती तेव्हा ते हरवले असल्याची भूमिका घेतली आणि या नुकसानीची माहिती त्यांनी डीएस बृहन्मुंबई पोलिसांना दिली.

याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलाच्या म्हणण्यानुसार, त्याने जात वैधता प्रमाणपत्र डाऊनलोड करून ते प्रमाणित करून घेतले, परंतु जेथे जात प्रमाणपत्राचा संबंध आहे त्याने २७ जून २०२४ रोजीच डुप्लिकेट जात प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आणि त्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या अर्जाची पावती सादर केली.

अधिवास प्रमाणपत्र तसेच जातीचा दाखला मिळविण्यासाठी सेतू द्वारे शासनाला भरलेल्या रक्कमेची दिनांक २७ जून २०२४ रोजीची पावती  देखील रेकॉर्डवर सादर केली आहे.

तिने आमच्यासमोर असे मांडले की, दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी पुन्हा एकदा आवश्यक ते शुल्क भरून डुप्लिकेट जातीचा दाखला मिळविण्यासाठी दुसऱ्यांदा अर्जाला दाखल केला होता आणि वास्तविक पाहता दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी याचिकाकर्त्याला जातीचा दाखला मिळाला, जो पुर्सिस फाईल क्राऊन रेकॉर्डवर ठेवण्यात आला आहे.

८. 'केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज फॉर्म ' सोबत अपलोड करण्यासाठी  आवश्यक असलेली कागदपत्रे आणि मागासवर्गीय

उमेदवारांची यादी असलेल्या माहिती पुस्तिकेच्या नियम १७ च्या अटींनुसार जेव्हा याचिकाकर्ता जात प्रमाणपत्र सादर करू शकला नाही आणि अनुसूचित जाती /जमातीच्या मागासवर्गीय उमेदवारांनी जाती/जमातीचे प्रमाणपत्र तसेच ते कोणत्या प्रवर्गातील आहेत त्यानुसार जाती/जमातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

याचिकाकर्त्याने वैधता प्रमाणपत्र सादर केले आणि एसएससी गुणपत्रिका, एचएससी गुणपत्रिका, पात्रता परीक्षेची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला यासह इतर कागदपत्रे मूळ स्वरूपात सादर करण्याची अट देखील पाळली याबद्दल वाद नाही. जातीचा दाखला वगळता प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लागणारी इतर सर्व कागदपत्रे याचिकाकर्त्याला मूळ स्वरूपात सादर करता आली होती, परंतु जात वैधता प्रमाणपत्राची मूळ प्रत सादर करता न आल्याने त्याला प्रवेश नाकारण्यात आला होता.

९. अशा परिस्थितीला सामोरे जाताना उत्तरवादी क्रमांक ३ ने उत्तरवादी क्रमांक २ शी पत्रव्यवहार केला आणि एका विद्यार्थ्याने कागदपत्रांची पडताळणी करताना मूळ कागदपत्रे हरवली आहेत असे

सांगितल्याचे कळविले आणि सल्ला मागितला त्यामुळे, कागदपत्राशिवाय विद्यार्थ्याला प्रवेश द्यावा का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

असा प्रश्न उपस्थित केल्यावर दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.००.२० वाजता उत्तरवादी क्रमांक २ कडून खालील प्रमाणे उत्तर मिळाले :

" संस्था, कृपया माहिती पुस्तिकेच्या पान क्रमांक ७३ चा संदर्भ घ्यावा आणि त्यानुसार निर्णय घ्यावा ."

१०. उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजला अशा प्रकारे माहिती पुस्तिकामध्ये नमूद केलेल्या अनिवार्य निर्देशाचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले होते, ज्यात अशा प्रकारे विचार केला गेला :

(५) संस्थेकडे सादर करणे :

i. उमेदवाराने आवश्यक ती फी भरून आणि आवश्यक कागदपत्रे मूळ स्वरूपात संबंधित संस्थेकडे सादर करून प्रवेश निश्चित करावा, ज्याला परिशिष्ठा मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रवेश दिला जातो.

ii. कॅप राऊंडसाठीच्या ठरलेल्या वेळेत जर उमेदवार हा आवश्यक मूळ कागदपत्रे सादर करताना केलाला दावा सिद्द करण्यात अपयशी ठरल्यास तर त्याचा वाटप केलेल्या जागेवरील दावा रद्द केला जातो.

iii. एखाद्या उमेदवाराला इतर कोणत्याही संस्थेत प्रवेश मिळाल्यामुळे प्रवेशाच्या वेळी मूळ दाखले सादर करता येत नसतील, तर त्याने/ तिने त्या संस्थेच्या प्रमुखाकडून एक प्रमाणपत्र सादर करावे, ज्यात त्याला/तिला विशिष्ट तारखेला त्या संस्थेतील विशिष्ट अभ्यासक्रमात प्रवेश मिळाला आहे आणि त्यामुळे मूळ प्रमाणपत्रे त्या संस्थेत ठेवली गेली असल्याचे दर्शविले आहे. उमेदवाराने संबंधित संस्थेच्या प्रमुखाने प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यापित प्रती सादर कराव्यात. अशा उमेदवारांनी प्रवेशाच्या वेळी तत्काळ शुल्क भरणे आवश्यक असून अशा उमेदवारांना शुल्क भरण्याच्या तारखेनंतर ०४ कार्यालयीन दिवसांच्या आत

आवश्यक मूळ दाखले सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

त्यामुळे उत्तरवादी क्रमांक ३ ने त्यानुसार कार्यवाही केली आणि याचिकाकर्त्याच्या नावे तात्पुरत्या प्रवेशाची पुष्टी करण्यास नकार दिला.

११. याचिकाकर्त्याने उपस्थित केलेली अडचण अशी आहे की, त्याने उत्तरवादी क्रमांक ३ - महाविद्यालयात त्याची जागा ऑटो फ्रीज केली होती, त्यामुळे त्याला पुढील फेऱ्यांमध्ये म्हणजेच कॅप राउंड -२ आणि ३ मध्ये भाग घेण्याची परवानगी नव्हती, दुसरी फेरी १९ ऑगस्ट, २०२४ रोजी सुरू झाली, तर तिसरी फेरी ६ सप्टेंबर, २०२४ रोजी सुरू झाली आणि ९ सप्टेंबर, २०२४ पर्यंत संपली होती.

उत्तरवादी क्रमांक ३ ने शपथपत्रात अशी भूमिका घेतली आहे की, कॅप राउंड - १, २ आणि ३ नंतर, रिक्त जागा भरण्याचे १० सप्टेंबर २०२४ ते १३ सप्टेंबर २०२४ पर्यंतचे वेळापत्रक हे १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत वाढवण्यात आले होते, याचिकाकर्त्याने १३ सप्टेंबर २०२४ रोजी

प्रक्रियेनुसार वाटप केलेल्या रिक्त जागांसाठी अर्ज केला नाही आणि आजपर्यंत एकही जागा रिक्त नसल्याची भूमिका घेण्यात आली आहे. हे नमूद करणे श्रेयस्कर आहे की, एकीकडे उत्तरवादी क्र.३ - कॉलेजने अशी भूमिका घेतली होती की, एकदा याचिकाकर्त्याला देण्यात आलेली जागा ऑटो फ्रीज झाली की, की त्यानंतरच्या फेऱ्यांमध्ये भाग घेण्यास वाव नाही, मग कोणत्याही परिस्थितीत, याचिकाकर्त्याने रिक्त जागांसाठी अर्ज करण्याचा कोणताही उद्भवत प्रश्न नाही.

याचिकाकर्त्याला काय हवे आहे तर गुणवत्तेनुसार जागा वाटप हवे आहे, जी वास्तविक पाहता त्याला देण्यात आली होती, परंतु जात प्रमाणपत्राची मूळ प्रत सादर करण्यात अपयशी ठरल्यामुळे, जरी त्याला जात पडताळणी समितीने दिलेले जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले असले, जे त्याने सादर केले होते तरी, अति तांत्रिक कारणास्तव, उत्तरवादी क्रमांक ३ ने त्याचा तात्पुरत्या प्रवेश कायम करण्यास नकार दिला.

१२. याचिकाकर्त्याने दिनांक ६ सप्टेंबर २०२३ रोजी प्रस्तुत याचिका दाखल केली आणि दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी उत्तरवादी क्रमांक २ ची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलाने उत्तर दाखल करण्यासाठी वेळ मागितला.

याचिकाकर्त्याचे जात प्रमाणपत्र हरवल्याचे प्रकरण लक्षात घेऊन आणि उत्तरवादी क्रमांक २ च्या वतीने केलेला युक्तिवाद की, याचिकाकर्त्याला कागदपत्रे सादर करण्याची तारीख ९ सप्टेंबर २०२४ असल्याने आणि जागा वाटप न झाल्याने तक्रार मांडण्याची संधी होती तो नोंदवत या न्यायालयाने दिनांक १३ सप्टेंबर, २०२४ रोजी आदेश दिला, ज्यात असे वाचावे :

“ ५) वरील वस्तुस्थिती रेकॉर्डवर ठेवावी लागेल आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असले तरी जात प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देश देणारा नियमही तपासावा लागेल. जर याचिकाकर्त्याचा प्रवेश आधीच रद्द करण्यात आला नसेल तर याचिकाकर्त्याला जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिलेली मुदत २४ सप्टेंबर, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

१३. २० सप्टेंबर, २०२४ रोजी खालील आदेश पारित करण्यात आला -

" पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकून घेतले.

२. १३ सप्टेंबर, २०२४ रोजीचा आदेश आणि २० सप्टेंबर २०२४ हि पुढील तारीख दिली असतानाही उत्तरवादी क्रमांक २ ने या प्रकरणी शपथपत्र दाखल न करण्याचा निर्णय घेतला आहे.

३. वैधता प्रमाणपत्र सादर करूनही जात प्रमाणपत्र सादर केले नाही या कारणास्तव याचिकाकर्त्याची अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची उमेदवारी रद्द करण्यात आल्याची नोंद आम्ही यापूर्वीच केली आहे.

४. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी उत्तरवादी क्रमांक २ कडून गंभीर आणि संवेदनशील दृष्टिकोनाची आम्हाला अपेक्षा होती कारण प्रथमदर्शनी आमचे असे मत होते की, याचिकाकर्त्याला जात प्रमाणपत्र सादर न करणे, जेव्हा त्याच्याकडे आधीपासून वैधता प्रमाणपत्र असेल आणि ते सादर केले आहे याचे पालन न केल्याबद्दल दोष देता येणार नाही.

५. आम्ही दिवसभराच्या कालावधीसाठी उत्तरवादी क्रमांक २ ला संधी दिली आहे कारण पूर्वार्धात आम्ही या प्रकरणाची सुनावणी ऐकली होती. मात्र, तोपर्यंत उत्तरवादी क्रमांक

दोन ने याचिकाकर्त्याची उमेदवारी रद्द करण्याच्या प्रकरणात स्वत:हून निर्माण झालेल्या समस्येवर कोणताही ठोस तोडगा न काढण्याचा निर्णय घेतला आहे.

६. आमच्या मते उत्तरवादी क्रमांक २ च्या वरील कृतीमुळे आणि ते सुद्धा उत्तरवादी क्रमांक २ च्या अति -तांत्रिक दृष्टिकोनामुळे, याचिकाकर्त्याचे शैक्षणिक वर्ष वाया जाते.

७. उत्तरवादी क्रमांक २ कडून एकच कारण समोर येत आहे की पोर्टल ०९.०९.२०२४ रोजी बंद केली होती आणि दिनांक १५.०९.२०२४ पर्यंत केवळ संस्थात्मक फेरी कार्यरत होती ज्यासाठी याचिकाकर्त्याने कोणताही पर्याय दिलेला नाही. या टप्प्यावर उत्तरवादी क्रमांक २ च्या विद्वान वकिलांनी नागपूर विभागात उपलब्ध असलेल्या रिक्त जागांची परिस्थिती मांडली असून तसे झाल्यास याचिकाकर्त्याला रिक्त दर्शविलेल्या कोणत्याही जागेवर सामावून घेतले जाऊ शकते, असे प्रतिपादन करण्यात आले आहे.

८. याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांनी निवेदन करण्यासाठी सोमवार पर्यंतची मुदत मागितली.

९.      २३.०९.२०२४ पर्यंत प्रलंबित. "

१४. उत्तरवादी क्रमांक २ ने दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी उत्तर दाखल केले होते आणि हे प्रकरण ३० सप्टेंबर २०२४ रोजी  ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते आणि ते संपवून आदेश पारित करण्यासाठी ठेवण्यात आले आणि आम्ही दिनांक  ३ ऑक्टोबर २०२४  रोजी निर्णय दिला आहे.

१५. उत्तरवादी क्रमांक २ बद्दल सांगायचे झाले तर याचिकाकर्त्याने यापूर्वी २५ जून २०२४ रोजी दाखल केलेल्या पोलिस तक्रारीचा संदर्भ दिला होता यात वाद नाही, परंतु आश्चर्याची बाब म्हणजे खालीलप्रमाणे भूमिका घेतली आहे-

> " ८. याचिकाकर्त्याने आपली स्कॅन केलेली  जात वैधता आणि जात प्रमाणपत्राची मूळ प्रत परिशिष्ट मुद्दा क्रमांक २ प्रक्रियेनुसार अपलोड केले आहे. या वेळी येथे नमूद करणे आवश्यक आहे की, याचिकाकर्त्याने यापूर्वी २५/०६/२०२४ रोजी दाखल केलेल्या पोलिस तक्रारीबद्दल सांगितले होते की त्याने आपली मूळ जात वैधता तसेच जातीचा दाखला आणि इतर कागदपत्रे गमावली आहेत.  याच वस्तुस्थितीवरून हे स्पष्ट होते की, याचिकाकर्त्याने

आपल्या जातीशी संबंधित कागदपत्रांचे वास्तव लपवले आहे, कारण दिनांक १५.७.२०२४ ते ३१.७.२०२४ या कालावधीत याचिकाकर्त्याने मूळ कागदपत्रांमधून स्कॅन करून आपली कागदपत्रे अपलोड केली आहेत. म्हणजेच, याचिकाकर्त्याकडे दिनांक १५.७.२०२४ ते ३१.०७.२०२४ या कालावधीत मूळ कागदपत्रे आहेत. मग असा प्रश्न उपस्थित होतो की, उत्तरवादी क्रमांक ३/ महाविद्यालयात मूळ कागदपत्रांची पडताळणी करताना याचिकाकर्ते खोटे का बोलले.

शपथपत्रात खालील बाबींचाही समावेश आहे -

" १२. असे सादर करण्यात आले की, कॅप राऊंड ३ ची शेवटची तारीख ०९/०९/२०२३ होती. दुर्दैवाने, जेव्हा याचिकाकर्त्याने या माननीय न्यायालयात धाव घेतली तेव्हा १३/०९/२०२४ रोजी कॅप प्रक्रिया आणि १०.९.२०२४ पासून एसीएपी आणि संस्थात्मक स्तराची फेरी सुरू झाली होती.

१३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) सर्वोच्च प्राधिकरण असल्याने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दिनदर्शिका ठरवते. २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील रिक्त पदांवर प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश कसा देता येईल, याचा निर्णयही एआयसीटीईकडून घेतला जातो. कॅप फेरीद्वारे बी.ई.मध्ये प्रथम वर्ष प्रवेशाच्या वेळापत्रकानुसार, ०९/०९/२०२४ ही शेवटची तारीख होती आणि १५/०९/२०२४ ही संस्थात्मक स्तरावरील फेरीतून बी.ई.ची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची शेवटची तारीख होती. उमेदवारांच्या संदर्भासाठी उत्तर देणाऱ्या उत्तरवादीने संकेतस्थळावर या उपक्रमाचे वेळापत्रक प्रसिद्ध केले होते.

शपथपत्राच्या परिच्छेद १५ मध्ये उत्तरवादी क्रमांक २ ने राखीव प्रवर्गातील रिक्त जागा दर्शविणाऱ्या संस्थांच्या यादीची प्रत रेकॉर्डवर ठेवली असून यामध्ये वर्धा येथील दोन आणि नागपूर विभागातील चंद्रपूर येथील एका महाविद्यालयाचा समावेश असून याचिकाकर्त्याकडे या महाविद्यालयांमध्ये देण्यात येणारे प्रवेश स्वीकारण्यास तो तयार आहे

का, अशी विचारणा केली असता, आम्हाला नकारार्थी उत्तर मिळाले आहे.

१६. आमच्यासमोर सादर करण्यात आलेल्या संपूर्ण पार्श्वभूमीवर आजपर्यंत जी स्थिती समोर आली ती अशी की, याचिकाकर्त्याला २६ सप्टेंबर २०२४ रोजी डुप्लिकेटमध्ये जात प्रमाणपत्र मिळाले आहे.

याचिकाकर्त्याने उत्तरवादी क्रमांक ३ - महाविद्यालयासमोर जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आणि या वैधतेच्या प्रमाणपत्रात उपविभागीय अधिकारी, काटोल, जिल्हा नागपूर यांनी दिनांक १६ एप्रिल २०१८ रोजी जारी केलेले जात प्रमाणपत्र क्र.२९४४/एमआरसी ८१/२०१७-२०१८ याचा स्पष्ट उल्लेख आहे, ज्यात आर्यन नरेश शेंडे ' चांभार (११) जाती/जमाती ' चे असल्याचे प्रमाणित केले आहे आणि ते ' वैध ' असल्याचे आढळले आहे.

जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याचा अधिकार असलेल्या सक्षम प्राधिकरणाकडून याचिकाकर्त्याला वैधतेचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, आमच्या मते, उत्तरवादी क्रमांक २ व ३ ने जातप्रमाणपत्र मूळ स्वरूपात सादर करण्याचा आग्रह धरणे अत्यंत तांत्रिक होते, जेव्हा याचिकाकर्त्याने त्याची कागदपत्रे हरवल्याचे स्पष्ट केले होते आणि त्याने संबंधित पोलिस ठाण्यात खूप आधी

तक्रारही दाखल केली होती आणि लवकरात लवकर दिनांक २७ जून २०२४ रोजी आवश्यक शुल्क भरून आवश्यक कागदपत्रे मिळवण्यासाठी सेतू या पोर्टलद्वारे अर्ज दाखल केला होता, परंतु दुर्दैवाने कागदपत्रे मिळाली नाहीत.

इंजिनीअरिंगच्या प्रवेश प्रक्रियेत शेवटच्या कॅप फेरीपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची वेळ दिली जाते, तेव्हा उत्तरवादी क्रमांक २ व ३ ने पहिल्या फेरीच्या टप्प्यावर याचिकाकर्त्याचा तात्पुरता प्रवेश रद्द करणे का योग्य मानले, हे आम्हाला समजत नाही, कारण कॅप प्रक्रियेच्या शेवटच्या फेरीपर्यंत वैधता प्रमाणपत्रे सादर करण्याची परवानगी असणे असामान्य नाही किंवा नंतरच्या काळात, जेव्हा जात छाननी समितीला उमेदवाराला जबाबदार नसलेल्या कारणास्तव जात दाव्याच्या पडताळणीचे काम करणे अशक्य झाले तेव्हा अगदी काही वेळा, सरकारने वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा लाभ वाढवला आहे.

याचिकाकर्त्याने स्वतःला अडचणीत आणले, कारण त्याने पसंती आणि त्याच्या गुणवत्तेच्या आधारावर जागा ऑटो फ्रिज केली होती आणि म्हणूनच त्याला उन्नती करण्यासाठी पुढे जाऊ दिले गेले नाही आणि म्हणूनच स्वत: अडकल्याचे त्याला आढळले.

१७. उत्तरवादी क्रमांक २ आणि ३ ने अत्यंत तांत्रिक दृष्टिकोन स्वीकारून पूर्णपणे स्वतःच्या गुणवत्तेवर आधारित त्याचा कायदेशीर हक्क त्याला नाकारण्याच्या दृष्टिकोन आम्ही उचलून धरत नाही, परिणामी त्याचा विपरीत परिणाम झाला आहे.

याचिकाकर्त्याचा कायदेशीर हक्क संपुष्टात येऊ नये, यासाठी कोणता दिलासा त्याला समाधान देऊ शकेल, हा प्रश्न आपल्यासमोर आहे.

नुकतेच वंश प्रकाश डोळस विरुद्ध शिक्षण मंत्रालय आणि आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय व इतर[1] या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाला याचिकाकर्त्याचा दावा फेटाळण्यात कोणतेही समर्थन आढळले नाही आणि कारणे दाखवण्याची संधी न देता कॅप राऊंड - १ मध्ये महाराष्ट्रासाठी असलेल्या कोट्या समोर त्याला दिलेला प्रवेश रद्द करण्याचे कॉलेजने दिलेले पत्र रद्द बातल केली हे बेकायदेशीर आणि मनमानी असल्याचे आढळून आले आणि कारण एमबीबीएस अभ्यासक्रमाचे चालू सत्र लक्षणीयरित्या पुढे गेले होते आणि सत्र सुरू होऊन सहा महिन्यांहून अधिक काळ लोटला होता आणि महाराष्ट्र राज्य कोट्यातील कोणत्याही महाविद्यालयात आजपर्यंत एकही जागा रिक्त रिक्त नसल्याने हा अडथळा निर्माण झाला आहे.

1२०२४ ए आय आर (एस सी) १९२४

उत्तरवादींच्या असंवेदनशील, अन्यायकारक, बेकायदेशीर आणि मनमानी दृष्टिकोनामुळे आणि न्यायालयीन प्रक्रियेतील दिरंगाईमुळे याचिकाकर्त्याला एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात त्याच्या हक्काच्या प्रवेशापासून बेकायदेशीरपणे वंचित ठेवण्यात आले, असे मत तयार झाल्याने मनोजकुमार विरुद्ध भारत सरकार आणि इतर[2] या प्रकरणामधील संकल्पनेनुसार दिलासा देण्यात आला आणि आम्ही वंश प्रकाश डोळस (उपरोल्लिखित) मधील निर्णयातील संबंधित पुनरुत्पादनाचे पुनरुत्पादन केले पाहिजे, जे खालीलप्रमाणे आहे :

" २७. एस. कृष्ण श्रद्धा विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य आणि इतर [४] या खटल्यात या न्यायालयाने वैद्यकीय अभ्यासक्रमाला चुकीच्या पद्धतीने प्रवेश नाकारण्याच्या मुद्द्याची तपासणी केली आणि खालीलप्रमाणे मान्य केले आणि

'न्यायाची पुनर्स्थापना ' हा सिद्धांत मांडला:-

१३. वर केलेल्या चर्चा/निरीक्षणांच्या अनुषंगाने प्राधिकरणाने ज्या गुणवंत उमेदवाराला/विद्यार्थ्याला कोणत्याही चुकी शिवाय बेकायदेशीरपणे किंवा

2. २०२४ एस सी सी ऑनलाईन एस सी १६३
४. (२०१७) ४ एस सी सी ५१६

अतर्क्यपणे एमबीबीएस अभ्यासक्रमात प्रवेश नाकारला आहे आणि ज्याने वेळेत न्यायालयात धाव घेतली आहे आणि अशा गुणवंत उमेदवाराला विनाकारण त्रास सहन करावा लागू नये, यासाठी आम्ही खालीलप्रमाणे निर्देशनाचे उत्तर देतो:

१३.१. ज्या प्रकरणात उमेदवार/विद्यार्थ्याने लवकरात लवकर व विनाविलंब न्यायालयात धाव घेतली असेल आणि प्रश्न वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात असेल तर संबंधित न्यायालयाकडून प्राधान्याने व लवकरात लवकर कार्यवाही निकाली काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

१३.२. अपवादात्मक परिस्थितीत, जर न्यायालयाला असे आढळले की उमेदवाराची कोणतीही चूक नाही आणि उमेदवाराने कोणत्याही विलंबाशिवाय त्याच्या कायदेशीर अधिकाराचा वेगाने पाठपुरावा केला आहे आणि केवळ प्राधिकारणांचा बाजूने चूक झाली आहे आणि / किंवा प्रवेश मंजूर करण्याच्या प्रक्रियेत नियम आणि नियमांचे तसेच संबंधित तत्त्वांचे स्पष्ट उल्लंघन आहे जे स्पर्धक उमेदवारांना समानतेच्या आणि समान वागणुकीच्या अधिकाराचे उल्लंघन करेल आणि विहित केलेले वेळापत्रक - ३० सप्टेंबर, संपले तर, पूर्ण न्याय करण्यासाठी, न्यायालयाने अपवादात्मक परिस्थितीत आणि दुर्मिळ प्रकरणी जागा वाढवण्याचे निर्देश देऊन त्याच वर्षी प्रवेशाचे निर्देश दिले, तथापि, तसे न

झाल्यास एक किंवा दोनपेक्षा जास्त जागा आणि असे प्रवेश वाजवी वेळेत, म्हणजे ३० सप्टेंबरपासून एका महिन्याच्या आत, म्हणजे कट ऑफ डेट आणि कोणत्याही परिस्थितीत, न्यायालय त्याच वर्षी ३० ऑक्टोबरच्या पुढे कोणत्याही प्रवेशाचे आदेश देऊ शकत नाही. तथापि, असा दिलासा केवळ अपवादात्मक परिस्थितीत आणि दुर्मिळ प्रकरणांमध्येच दिला जाऊ शकतो, असे निदर्शनास आले आहे. जर एखाद्या जास्त गुणवंत उमेदवारास बेकायदेशीर रित्या किंवा चुकीच्या पद्धतीने प्रवेश नाकारण्यात आला असेल आणि गुणवंत उमेदवाराला प्रवेश मिळायलाच हवा असे अगदी न्यायालयाला वाटत असेल अशा कोंडीच्या परिस्थितीमध्ये त्या गुणवंत विद्यार्थ्याला प्रवेश देण्यासाठी न्यायालय हे त्या श्रेणीच्या गुणवत्ता यादीच्या शेवटी असलेल्या उमेदवाराचा प्रवेश रद्द करेल परंतु, असे करण्यापूर्वी ज्या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्याचा निर्धार न्यायालयने केला असेल त्या विद्यार्थ्याचे म्हणणे एकूण घेण्याची संधी न्यायालय त्यास देईल.

१३.३. प्रकरणात न्यायालयाचे असे मत आहे की, अशा उमेदवाराला त्याच शैक्षणिक वर्षात प्रवेशाचा कोणताही दिलासा देता येणार नाही आणि जिथे प्राधिकरणांची कारवाई हि मनमानी आणि नियम-कायदे भंग करणारी किंवा विद्यार्थ्यांच्या हक्कांवर परिणाम करणारी किंवा निर्देश - पुस्तिका विद्यार्थ्यांच्या

हक्कावर परिणाम करत असल्याचे आढळले आणि एखादा उमेदवार गुणवान असल्याचे आढळले आणि अशा उमेदवाराने / विद्यार्थ्याने लवकरात लवकर न्यायालयात धाव घेतली आहे आणि कोणताही विलंब न करता न्यायालय अशा उमेदवाराला दिलासा देऊ शकते आणि या प्रकरणात योग्य वाटेल त्या जागांची संख्या वाढविण्याचे निर्देश देऊन योग्य निर्देश जारी करून आणि व्यवस्थापनाची चूक असल्याचे निदर्शनास आल्यास व गुणवंत उमेदवाराला प्रवेश नाकारल्याचे निदर्शनास आल्यास, अशा परिस्थितीत न्यायालय त्या वर्षाच्या व्यवस्थापन कोट्यातील जागांची संख्या कमी करण्याचे निर्देश देऊ शकते, म्हणजे ज्या विद्यार्थी/विद्यार्थ्यांना बेकायदेशीरपणे प्रवेश नाकारण्यात आला होता/त्यांना व्यवस्थापन कोट्यातील जागांपैकी पुढील शैक्षणिक वर्षात सामावून घेण्याचे निर्देश देता येतील.

१३.४. नुकसान भरपाई देणे हा एक अतिरिक्त उपाय असू शकतो परंतु प्रत्यास्थापन दिलास्यांना पर्याय नाही. त्यामुळे योग्य परिस्थितीत न्यायालय अशा गुणवंत उमेदवाराला नुकसान भरपाई देऊ शकते, ज्याला विनाकारण संपूर्ण एक शैक्षणिक वर्ष गमवावे लागते आणि ज्यांना त्याच शैक्षणिक वर्षात प्रवेशाचा कोणताही दिलासा देता येत नाही.

१३.५. हे स्पष्ट करण्यात आले आहे की, वरील निर्देश केवळ एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशाशी संबंधित आहेत आणि आम्ही पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम हाताळला नाही.

१८. वरील निरीक्षणांचा आधार घेत सर्वोच्च न्यायालयाच्या त्यांच्या माननीय न्यायाधीश यांनी नमूद केले की, वेळ निघून गेल्यामुळे, एमबीबीएस (युजी) अभ्यासक्रमाच्या चालू सत्रात अपीलकर्त्याला प्रवेश देणे इष्ट किंवा न्याय्य ठरणार नाही. मात्र, अर्जदाराचा प्रवेश रद्द करण्याचा आदेश दिनांक ९ ऑगस्ट २०२३ रोजी जरी करण्यात आला आणि सदर रिट याचिका तत्काळ म्हणजे दिनांक १० ऑगस्ट २०२३ रोजी विनाविलंब उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली, हि वस्तुस्थिती लक्षात घेऊन अपीलकर्त्याला पुढील सत्रात म्हणजेच एन इ इ टी यूजी - २०२४ त्याच महाविद्यालयातील एमबीबीएस (युजी) अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षातील आपली जागा पूर्ववत करण्यास पात्र ठरवण्यात आले होते.

१९. सध्याच्या प्रकरणात, अति-तांत्रिक दृष्टिकोनाचा अवलंब करून याचिकाकर्त्याला उत्तरवादी क्रमांक ३- कॉलेजमध्ये चुकीच्या पद्धतीने प्रवेश नाकारण्यात आला या निष्कर्षापर्यंत आम्ही आधीच पोहोचलो आहोत, त्यामुळे

याचिकाकर्त्याचे नुकसान टाळण्यासाठी आपण निश्चितपणे तोडगा दिला पाहिजे, कारण याचिकाकर्त्याची कोणतीही चूक नाही आणि त्याने ६ सप्टेंबर, २०२४ रोजी म्हणजेच कॅप राउंड - ३ ची शेवटची तारीख जी ९ सप्टेंबर, २०२३ होती त्यापूर्वी या न्यायालयात धाव घेतली होती आणि या न्यायालयाने दखल घेऊन आवश्यक आदेश दिले, ज्याचा संदर्भ आम्ही आधीच दिला आहे.

चार वर्षांच्या अंडर ग्रॅज्युएट टेक्निकल कोर्सेस आणि इंजिनीअरिंग टेक्नॉलॉजीच्या प्रवेशाची शेवटची तारीख हि १३ सप्टेंबर २०२४ आहे, जी नंतर २३ ऑक्टोबर २०२४ पर्यंत वाढवण्यात आली आहे, याचिकाकर्त्याची संधी हुकली आहे आणि त्याला पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्याचे निर्देश देऊन ज्यामुळे एक वर्षाचे नुकसान होईल, त्याने तसे करू नये अशी आमची इच्छा आहे.

२०. याचिकाकर्त्याला उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजमध्ये परत जागा कशी मिळवून देता येईल, या आमच्यासमोरील कोंडीचे उत्तर माहिती पुस्तिकाच देते.

सदर माहितीपत्रकात स्नातक पूर्व, पदव्युत्तर, एकात्मिक किंवा दुहेरी पदवी तांत्रिक अभ्यासक्रमांसाठीच्या विविध अभ्यासक्रमांसाठी मंजूर प्रवेश आणि अधिसंख्य जागा अशा दोन प्रकारच्या जागा विहित केल्या आहेत, ज्या संबंधित

अभ्यासक्रमांना मान्यता देण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने दिलेल्या मान्यतेनुसार असतील.

माहितीपत्रकाच्या नियम ६ (२) मध्ये वेळोवेळी योग्य प्राधिकरणाने मान्यता दिल्याप्रमाणे अधिसंख्य जागा खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना उपलब्ध असतील, असा विचार करण्यात आला होता.

नियम ७, उपखंड (५) मध्ये अधिसंख्य जागांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे :

(ए) ओसीआय किंवा पीआयओ, परदेशी विद्यार्थी आणि आखाती देशांमधील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी अधिसंख्य जागा.

(बी) जम्मू-काश्मीर तसेच लडाख स्थलांतरित उमेदवारीसाठी अधिसंख्य जागा.

(सी) शिक्षण शुल्क माफी योजनेच्या (टीएफडब्ल्यूएस) जागा.

२१. आम्ही, उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेज तर्फे उपस्थित विद्वान वकिलांकडे विशेषत: विचारणा केली आहे की, त्यांनी अधिसंख्य जागा

भरल्या आहेत की नाही आणि आम्हाला प्रतिसाद मिळाला आहे की त्यांनी त्याचा लाभ घेतला नाही.

२२. याचिकाकर्त्याने प्रतिष्ठेत संस्थेत प्रवेश घेण्यासाठी आवश्यक गुण मिळवून सामायिक प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण होणे आणि गुणवत्ता आणि उत्कृष्टता हा एकमेव निकष असणे आवश्यक असल्याने, प्रक्रियेच्या सूक्ष्मतेवर प्राधान्य मिळणे आवश्यक आहे आवश्यक आहे, म्हणून आम्हाला याचिकाकर्त्याला जागा देण्यास कोणताही संकोच नाही, जरी आम्हाला अधिसंख्य सीट सक्रिय करण्याचे निर्देश देणे आवश्यक आहे, कारण याचिकाकर्त्याच्या स्वतःच्या गुणवत्तेच्या आधारे उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याच्या अधिकारावर गदा आणण्याचा किंवा याचिकाकर्त्याच्या जागी जागा वाटप केलेल्या इतर कोणत्याही उमेदवाराला नाराज करण्याचा आमचा हेतू नाही.

२३. या खटल्याच्या असाधारण परिस्थितीत, जातीचा दाखल्याची मूळ प्रत नसल्याच्या क्षुल्लक कारणास्तव तात्पुरत्या प्रवेश कायम करण्यापासून चुकीच्या पद्धतीने वंचित राहिलेल्या याचिकाकर्त्याला त्याच्या बाजूने न्याय देण्याचा आमचा मानस आहे आणि उत्तरवादी - प्राधिकरण पूर्णपणे असंवेदनशील आहेत आणि त्यांनी अन्यायकारक दृष्टिकोन अवलंबला आहे, असे आमचे स्पष्ट मत

आहे, ज्याचे वर्णन आपण केवळ अत्यंत तांत्रिक म्हणून करू शकतो, ज्यामुळे याचिकाकर्त्याचे करिअर धोक्यात आले आहे.

अशा परिस्थितीत, उत्तरवादी क्रमांक ३ कॉलेजने तयार केलेल्या अधिसंख्य जागेवर याचिकाकर्त्याला प्रवेश देणे आम्हाला योग्य वाटते, कारण आमचा इतर कोणत्याही विद्यार्थ्याला त्रास देण्याचा हेतू नाही आणि उत्तरवादी क्रमांक १ आणि २ ने या जागेस मान्यता द्यावी अशी आमची अपेक्षा आहे, कारण उत्तरवादीने तयार केलेले नियम स्पष्टपणे अधिसंख्य जागांचा विचार करतात.

२४. वर केलेल्या चर्चेमधून आम्ही याचिका मंजूर करून खालील आदेश पारित करत आहोत : –

(i) आम्ही उत्तरवादी क्रमांक ३, कर्मवीर दादासाहेब कन्नमवार (के.डी.के.), इंजिनीअर कॉलेज, नागपूर यांना परमादेश स्वरूपात रीट जारी करतो आणि निर्देश देतो की, याचिकाकर्ते आर्यन नरेश शेंडे यांचा २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी कॉम्प्युटर सायन्स व अभियांत्रिकीमध्ये तात्पुरता प्रवेश कायम करण्यात यावा, कारण त्यांना देण्यात आलेला तात्पुरता प्रवेश रद्द करणे हे

त्यांच्यासाठी अन्यायकारक व अयोग्य असून आणि ते गुणवत्तेनुसार त्यांचा कायदेशीर हक्क नाकारण्यासारखे आहे.

(ii) याचिकाकर्त्याने ४ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजण्यापूर्वी जातीच्या दाखल्याच्या मूळ प्रतिसह उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजला भेटावे आणि उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजने तो रेकॉर्डवर घ्यावा.

(iii) याचिकाकर्त्याने त्याचा तात्पुरत्या प्रवेश कायम करण्यासाठी उत्तरवादी क्रमांक ३ - कॉलेजने विहित केलेल्या पुढील आवश्यक प्रक्रियेंचे पालन करावे.

२५. वरील अटींवर न्यादेश कायम करण्यात येत आहे. खर्चाबाबत आदेश नाही.

( न्या. अभय ज. मंत्री ) (न्या. भारती डांगरे )

- x - x - x - x - x - x - x - x -

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

- x - x - x - x - x - x - x - x -